**सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येत असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**शासन निर्णय क्रमांक : शिवाप-२०१०/प्र.क्र.५०४/नापू-२८**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ११ फेब्रुवारी, २०११.

पहा : १) शासन निर्णय क्र.साविव्य-१००९/प्र.क्र.३१८/नापु-२८, दि. २७.८.२००९.
२) शासन निर्णय क्र.साविव्य-१००९/प्र.क्र.३१८/नापु-२८, दि. ३.१२.२००९.
३) शासन निर्णय क्र.शिवाप-२०१०/प्र.क्र.१५६/नापु-२८, दि. ६.५.२०१०.
४) शासन निर्णय क्र.शिवाप-२०१०/प्र.क्र.५०४/नापु-२८, दि. २१ ऑक्टोबर, २०१०.

**प्रस्तावना :-**

जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत सातत्याने वाढ होत असल्याचे व राज्यातील गरीब जनता खुल्या बाजारातील धान्य खरेदी करुन आपली गरज सुयोग्यरित्या पूर्ण करु शकत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे वाढत्या महागाईपासून गरीब जनतेला व विशेषत: समाजातील आर्थिक दूर्बल वर्गास संरक्षण देण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरीत करण्यात येत असलेल्या गहू, तांदूळ, तुरदाळ पामतेल व साखर अशा ५ वस्तूंच्या किंमती वरील संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक २७/८/२००९ च्या शासन निर्णयान्वये स्थिर ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून सदर योजनेस वेळावेळी संदर्भाधिन क्र.२, ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत लाभार्थ्यांना रास्त दरात व मुबलक प्रमाणात सदर वस्तू उपलब्ध करुन देवून वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवून सर्व सामान्य नागरिकांना दिलासा देणे हा मुख्य हेतू हा निर्णय घेण्यामागे आहे. त्यामुळे सदरहू योजनेस मुदतवाढ देऊन आता सदर योजना जानेवारी, २०११ अखेरपर्यन्त चालू ठेवण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** वरील प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार खालील लाभार्थ्यांसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित होणा-या गहू, तांदूळ, तूरडाळ, पामतेल व साखर या ५ शिधावस्तूंच्या स्वस्त धान्य दुकानातील किरकोळ विक्री किंमती जानेवारी, २०११ अखेरपर्यन्त स्थिर ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या ५ शिधावस्तूंच्या किंमती व परिमाण खालील प्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | वस्तूचे नाव | सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणा-या शिधा वस्तुंच्या किंमती (रुपये प्रति किलो/लिटर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | अंत्योदय अन्न योजना | अन्नपूर्णा योजना | एपीएल |
| १ | गहू | ५.०० | २.०० | विनामुल्य | ७.२० |
| २ | तांदुळ | ६.०० | ३.०० | | ९.६० |
| ३ | साखर | १३.५० | १३.५० | १३.५० | २०.०० |
| ४ | तूरडाळ | ५५.०० | ५५.०० | ५५.०० | ५५.०० |
| ५ | पामतेल | ३०.०० | ३०.०० | ३०.०० | ३०.०० |

| अ. क्र. | वस्तूचे नाव | सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणा-या शिधा वस्तुंच्या वाटपाचे परिमाण (दरमहा) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | अंत्योदय अन्न योजना | अन्नपूर्णा योजना | एपीएल |
| १ | गहू | ३५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | ३५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | १० किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ) | १५ किलो प्रतिकार्ड (गहू + तांदुळ)* |
| २ | तांदुळ | | | | |
| ३ | साखर | ५०० ग्रॅम प्रति माणशी | ५०० ग्रॅम प्रति माणशी | ५०० ग्रॅम प्रति माणशी | २ किलो प्रतिकार्ड |
| ४ | तूरडाळ | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड | १ किलो प्रतिकार्ड |
| ५ | पामतेल | १ लिटर प्रतिकार्ड | १ लिटर प्रतिकार्ड | १ लिटर प्रतिकार्ड | १ लिटर प्रतिकार्ड |

* *गहू व तांदूळ प्रमाणे अनुक्रमे १० व ५ किलो असेल. ज्या जिल्ह्यात तांदूळ प्रामुख्याने खाल्ला जातो तिथे तांदूळ व गहू प्रमाण अनुक्रमे १० व ५ किलो असेल. एपीएल लाभार्थ्यांकरिता मंत्रिमंडळाने निश्चित केलेल्या परिमाणात लवचिकता ठेवून जिल्हयांकडून जादा गव्हाची मागणी आल्यास, त्याप्रमाणे संबंधित जिल्हयास उपलब्ध करुन देण्यात येईल.*

**२.** उपरोक्त धोरणानुसार जानेवारी, २०११ अखेर पर्यंत गहू, तांदूळ तूरडाळ व पामतेलाच्या केंद्रीय विक्री किमतीत तसेच साखरेच्या किरकोळ विक्री किमतीत साखर महासंघाकडून वाढ झाली किंवा या ५ शिधावस्तूंवरील राज्य शासनाच्या प्रशासकीय खर्चात वाढ झाली तरीही या ५ शिधावस्तूंच्या रास्तभाव / अधिकृत शिधावाटप दुकानातील किरकोळ विक्री किंमती सध्याच्या ( वर नमूद केलेल्या ) पातळीवरच स्थिर ठेवल्या जातील. त्यात वाढ केली जाणार नाही. त्यासाठी आवश्यकतेनुसार राज्यशासनास येणारा खर्च अनुदानाद्वारे भागविला जाईल.

**३.** या वस्तूंच्या खरेदी किंमतीत वाढ झाल्यास किंवा सार्वजनिक वितरणासाठी लागणा-या अनुषुंगिक खर्चात वाढ झाल्यास जो खर्च येईल तो भरुन काढणेसाठी अर्थसहाय्य दयावे लागेल. त्याची तरतूद सर्व प्राकलन अधिका-यांकडून प्राप्त झालेल्या मागणीच्या आधारे, राज्याच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून योजनेतर मागणी क्रमांक -एम-२ मुख्य लेखा शीर्ष-२४०८ अन्न साठवण व वखार साठवण (०१) अन्न (१०१) प्रापण वितरण व किंमत नियंत्रण (०३) (०७) अन्नधान्य व्यवहारातील तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी अर्थसहाय्य (३३) (२४०८०४११) अंतर्गत जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवण्यासाठी लागणारे अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली उपलब्ध करण्यात येईल व हस्तांतरणाने II मागणी क्रमांक एम-४ -मुख्य लेखा शीर्ष ४४०८ अन्न साठवण व वखार साठवण १०१ प्रापण व पुरवठा (०२) (०१) मुंबई शहर (४४०८००७७) वळती करुन संबंधिताना प्रत्यक्ष उचली (lifting) च्या आधारे त्याचे वाटप करण्यात येईल. अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांचे दैनंदिन व्यवहार सुरळीत सुरु राहण्याच्या दृष्टीने अपर जिल्हाधिकारी / पुरवठा उपायुक्त / नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांनी दरमहा पामतेल, तुरडाळ व साखर या वस्तुंच्या प्रत्यक्ष उचलीची माहिती न चुकता, वित्तीय सल्लागार व उप सचिव यांचे कार्यालयास सादर करावी. त्यासाठी लागणारा पतपुरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी वित्तीय सल्लागार व उप सचिव यांनी घेणेची आहे.

४. वरील शिधावस्तूंच्या खरेदी किंमतीत किंवा राज्य शासनाच्या प्रशासकीय खर्चाच्या घटकांमध्ये यापुढे वाढ झाली तरी या ५ वस्तूंच्या किरकोळ विक्री किंमती वर नमूद केलेल्या सध्याच्या पातळीवर कायम ठेवण्याबाबत, संबंधित कार्यासनानी वेळोवेळी आवश्यकतेनुसार कार्यवाही करावी आणि राज्य शासनाने किंमती स्थिर ठेवण्यासंबंधात घेतलेल्या वरील महत्वाच्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करावी.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर टाकण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०२११२१३०३५००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भै. भा. पारखी )
उप सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
मुख्य सचिव
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व उप आयुक्त (पुरवठा)
सर्व जिल्हाधिकारी / सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/वा), पुरवठा भवन, परेल, मुंबई
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
सर्व उप सचिव /अवर सचिव / कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय खाजगी सचिव, सर्व मंत्री कार्यालये / सर्व राज्यमंत्री कार्यालये
खाजगी सचिव, मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे कार्यालय
खाजगी सचिव, मा. राज्य मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे कार्यालय
प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय , मुंबई
कार्यासन नापु-२८ ची निवड नस्ती.